# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः04.05.2024**

**वारःशनिवार**

---

1. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाची आजवरची सर्वात मोठी मतदार जागृती मोहीम
2. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया काल संपली. महाराष्ट्रात 397 उमेदवारांचे 512 अर्ज दाखल
3. निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी प्रचाराला वेग
4. कांद्याच्या निर्यातीवरील बंदी केंद्र सरकारकडून मागे. आणि
5. केरळ आणि तामिळनाडूच्या किनारपट्टीवर मोठ्या लाटा थडकण्याबाबत तीव्र खबरदारीचा इशारा

**<u>मतदार-जागृती</u>**

लोकसभा निवडणुकीत मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी निवडणूक आयोगानं आतापर्यंतची सर्वात मोठी जनजागृती मोहीम हाती घेतल्याचं निवडणूक आयोगानं काल सांगितलं. विविध सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातल्या संस्थांनी या जनजागृती मोहिमेसाठी आयोगाला सहकार्य केलं आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात 66 पूर्णांक 14 टक्के आणि दुसऱ्या टप्प्यात 66 पूर्णांक 71 टक्के इतकं विक्रमी मतदान झालं आहे, मात्र हे प्रमाण 2019 च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या मतदानापेक्षा कमी आहे असंही निवडणूक आयोगानं सांगितलं. मतदानाच्या तिसऱ्या टप्प्यावर उष्णतेच्या लाटेचा संभाव्य परिणाम टाळण्यासाठी उपाययोजनांसंदर्भात निवडणूक आयोगानं हवामान विभाग, आरोग्य विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांच्या वरिष्ठ तज्ज्ञानसोबत बैठक घेतली.

**<u>उमेदवारी</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया काल संपली. आज उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून सोमवारी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची शेवटची मुदत आहे. येत्या 20 मे रोजी सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील लोकसभेच्या 49 जागांसाठी मतदान होणार आहे. दरम्यान ओडिशातील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रियाही काल संपली. या टप्प्यात महाराष्ट्रातील मुंबईतल्या सर्व सहा मतदारसंघांसह नाशिक, दिंडोरी, पालघर, भिवंडी, ठाणे, कल्याण आणि धुळे मतदारसंघात 20 मे रोजी मतदान होणार आहे. शेवटच्या दिवशी काल संध्याकाळपर्यंत 397 उमेदवारांचे 512 अर्ज दाखल झाले असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली. उत्तर प्रदेशमध्येही काल अनेक मान्यवरांनी आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. काँग्रेससह काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी उत्तर प्रदेशातल्या रायबरेली मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरण्यापूर्वी त्यांनी मोठा पथ फेरी काढली. यावेळी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, पक्षाच्या सरचिटणीस प्रियंका गांधी-वडरा आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते अशोक गेहलोत यांच्यासह हजारो कार्यकर्ते पथ फेरीमध्ये सहभागी झाले होते. तर रायबरेलीमधून भाजपाचे उमेदवार दिनेश प्रताप सिंह आणि अमेठीतून काँग्रेस पक्षाचे उमेदवार किशोरीलाल शर्मा यांनीही काल उमेदवारी अर्ज दाखल केले.

**<u>प्रचार</u>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी प्रचाराला केवळ दोन दिवस उरले असल्यानं प्रचाराला वेग आला आहे. विविध राजकीय पक्षांचे नेते देशाच्या विविध भागात मेळावे आणि पथ फेरी करत आहेत. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज बिहारमधील दरभंगा इथं भाजपचे उमेदवार गोपालजी ठाकूर यांच्या समर्थनार्थ जाहीर सभा घेणार आहेत.

राष्ट्रीय जनता दलानं या जागेवरून पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विद्यमान आमदार ललित कुमार यादव यांना उमेदवारी दिली आहे. तत्पूर्वी, मोदींनी झारखंडमधील पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातल्या चाईबासा इथं जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी झारखंडमधील इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांवर जोरदार टिका केली. भाजपच्या ताकदीमुळेच झारखंड हे बिहारमधून वेगळे राज्य बनलं आहे, असंही ते म्हणाले.

समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही काल उत्तर प्रदेशातील मैनपुरी आणि कन्नौज इथं जाहीर सभा घेतली. काँग्रेस राज्यघटना कधीच रद्द होऊ देणार नाही, असं म्हणत भाजप-आरएसएसचे नेते संविधान बदलण्याची भाषा करत असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. ते काल महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातल्या चारही मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ काल पुण्यात झालेल्या सभेत बोलत होते. भाजपा नेते आणि केंद्रिय मंत्री अमित शहा यांनीही काल रत्नागिरी आणि सांगलीत प्रचारसभा घेतली. भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी आणि आम आदमी पक्षाचे नेते भगवंत मान आज गुजरात राज्यात प्रचार सभा घेणार आहेत.

**बेबाकी**

निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना लोकसभा निवडणुकीतील इच्छुक उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रांमध्ये थकबाकी नसल्याचं प्रमाणपत्र कालबद्धरित्या समाविष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात सर्व उमेदवारांसाठी प्रतिज्ञापत्रासह नामांकन अर्ज भरण्याच्या महत्त्वावरजोर दिला असून प्रतिज्ञापत्रातील कोणताही रकाना रिक्त न ठेवता पूर्ण भरणं आवश्यक असल्याचं म्हटलं आहे.

**कांदा निर्यात**

कांद्याच्या निर्यातीवरील बंदी केंद्र सरकारनं उठवली आहे. परराष्ट्र व्यापार संचालनालयानं जारी केलेल्या अधिसुचनेनुसार, आदेश त्वरीत लागू होणार असून त्यासाठी किमान 550 प्रति मेट्रिक टन निर्यात किंमत असणे गरजेचे आहे. गेल्याच महिन्यात केंद्राने सहा देशांना 99 हजार मेट्रीक टन कांदा निर्यातीस परवानगी दिली होती. तसंच पश्चिम आशिया आणि युरोपीय देशातल्या निर्यात बाजारपेठेसाठी दोन हजार मेट्रीक टन पांढरा कांदा निर्यातीस केंद्रानं परवानगी दिली होती. 2023-24 मध्ये देशांतर्गत उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये कांद्याच्या निर्यातीवर निर्बंध घातले होते.

**आसियान**

26 व्या आसियान-भारत वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक काल नवी दिल्लीत पार पडली. सचिव जयदीप मुझुमदार यांनी सिंगापूरच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातील स्थायी सचिव अल्बर्ट चुआ यांच्यासमवेत बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषवलं. सिंगापूर हा आसियान-भारत संवाद संबंधांसाठी भारताचा समन्वयक देश आहे. या बैठकीला सर्व आसियान सदस्य देशांचे वरिष्ठ अधिकारी आणि प्रतिनिधी तसंच आसियानमधील निरीक्षक दर्जाचे अधिकारी तिमोर लेस्टे हे ही उपस्थित होते. या बैठकीदरम्यान, राजकीय-सुरक्षा, आर्थिक आणि सामाजिक-सांस्कृतिक संबंधांविषयी आसियान -भारत संबंधांचा आढावा घेण्यात आला.

**सीबीआय कारवाई**

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानं राष्ट्रीय औष्णिक उर्जा प्राधिकरणाच्या एका वरिष्ठ व्यवस्थापकीय अधिकाऱ्याला लाचखोरी प्रकरणात अटक केली आहे. तक्रारदाराकडून आठ लाख रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी सीबीआयनं ही कारवाई केली आहे. तक्रारदाराच्या कंपनीचं बिल मंजूर करण्यासाठी लाच मागितल्याची तक्रार एका जाहिरात कंपनीच्या उपाध्यक्षांनी केली होती. त्याआधारे या अधिकाऱ्याविरूद्ध गुन्हा नोंदवण्यात आला होता. दिल्लीहून लाच घेण्यासाठी मुंबईत आलेल्या अधिकाऱ्याला सीबीआयनं सापळा रचून काल अटक केली. तसंच नोएडातल्या त्याच्या घराची झडती देखील घेतली. आरोपीला आज न्यायालयासमोर हजर करणार असल्याची माहिती सीबीआय नं दिली आहे.

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून चार दिवस हिमाचल प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. या काळात त्या सिमल्याजवळच्या छारबरा इथल्या राष्ट्रपती निवासामध्ये मुक्काम करणार आहेत.

**फूटबॉल**

सिक्किम फुटबॉल असोसिएशनच्या थुपडेन रापग्याल स्मृती करंडक या 15 वर्षाखाली मुलांच्या फुटबॉल स्पर्धांची घोषणा काल करण्यात आली. सिक्किममधले फुटबॉलचे प्रसिद्ध प्रशिक्षक दिवंगत थुपडेन रापग्याल हे थुपडेन सर या नावाने प्रसिद्ध होते. स्पर्धेचं हे पहिलं वर्ष असून ती खुली बाद स्वरुपात खेळली जाईल तर पुढल्या वर्षीपासून पंधरा वर्षाखालील मुलांची लीग म्हणून ही स्पर्धा आयोजित केली जाणार आहे.

**जागतिक अँथलेटिक्स**

पॅरिस ऑलिम्पिक 2024मध्ये रिले क्रीडाप्रकारासाठी पात्रता स्पर्धा असलेली जागतिक अँथलेटिक्स रिले 2024 आजपासून बहामास इथं होणार आहे. 2023 च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील 4 बाय 400 रिले स्पर्धेचे विजेते अमोज जेकब, मोहम्मद याहिया, मोहम्मद अजमल आणि राजेश रमेश या स्पर्धेत भारताचं प्रतिनिधित्व करतील. भारतीय महिला 4 बाय 400 रिले संघात सात सदस्यांचा समावेश आहे. त्यामध्ये आशियाई क्रीडा स्पर्धेतल्या रौप्यपदक विजेत्या संघातल्या विथ्या रामराज, ऐश्वर्या मिश्रा, प्राची आणि सुभा वेंकटेशन यांचा समावेश आहे.

**तेलंगण उष्णततेची लाट**

देशाच्या पूर्व आणि दक्षिण भागात उद्यापर्यंत उष्णतेची लाट कायम राहाणार असून नंतर ती कमी होण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. तेलंगण राज्यातल्या बहुतांश भागाला उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसला आहे. एकंदर 16 जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान 46 अंशांच्या वर नोंदवण्यात आलं. पेडापल्ली, सूर्यपेट, जगत्याल आणि खम्मम जिल्ह्यात काल चार ठिकाणी सर्वाधिक 46 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

**केरळला लाल बावटा**

केरळ आणि तमिळनाडूच्या किनारपट्टीवर आज सकाळपासून उच्च क्षमतेच्या लाटा उसळणार असल्याचा अंदाज नॅशनल सेंटर फॉर ओशन इन्फॉर्मेशन सर्विसेस अर्थात राष्ट्रीय महासागर माहिती सेवा यांनी वर्तवला आहे. त्यामुळे आज आणि उद्या केरळला तीव्र खबरदारीचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक भाषेत कल्लाकडल म्हणून या स्थितीला ओळखले जाते. ही स्थिती उद्या रात्रीपर्यंत राहाण्याची शक्यता असल्यानं किनारपट्टीवरील लोकांना खबरदारीचा इशारा देत किनारपट्टीवरील हालचाली मर्यादा आणल्या आहे. तसंच किनारपट्टीवरील रहिवाशांना तात्पुरते स्थलांतर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.